पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिती

**कार्यपत्रिका क्रमांक - ७१**

**<u>सभावृत्तांत</u>**

दिनांक - ३०/०७/२०१३ वेळ - दुपारी ३.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा मंगळवार, दिनांक ३०/०७/२०१३ रोजी दुपारी ३.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.जगदिश शेट्टी
८) मा.भालेकर अरुणा दिलीप
९) मा.वाघेरे सुनिता राजेश
१०) मा.बारणे माया संतोष
११) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१२) मा. लोंढे गणेश नारायण
१३) मा.कदम सदगुरु महादेव
१४) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.कारचे, मा.कुलकर्णी, मा.ढेरे, मा.दुरगुडे, मा.फुंदे - सहा. आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण – सह शहर अभियंता, मा.भोसले - मुख्यलेखापाल , मा.डॉ.मनोज देशमुख – प्र.आरोग्य वैद्यकिय अधिक्षक, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.थोरात, मा.तांबे मा.साळवी, मा.खाबडे, मा.दांगट, मा.चिंचवडे, मा.कपिले, मा.सय्यद, मा.काची, मा.बरशेट्टी - कार्यकारी अभियंता, मा.साळुंके – मुख्य उद्यान अधीक्षक, मा.डॉ.गोरे - पशुवैद्यकीय अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-------

**<u>उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले :-</u>**

विषय क्र.२१) बहीणाबाई चौधरी प्राणी संग्रहालयाकरीता आर्कीटेक्ट यांची नेमणूक करणेबाबत.

विषय क्र.२२) से.क्र.१७ व १९चिखली येथील असलेल्या ***EWS Housing*** प्रकल्पाच्या जागेचे अधिमूल्य प्राधिकरणास (***PCNDTA***) देणेबाबत.

विषय क्र.२३) अ प्रभागातील सन २०१३-१४ चा मूळ अंदाजपत्रकातील विशेष योजनेतील विकास कामाच्या तरतूदीमध्ये वाढ घट करणेबाबत-मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२४) सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत-मा.गणेश लोंढे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२५) निगडी प्राधिकरण ४५ मी.रुंदीच्या स्पाईन रस्त्यावरील मध्य दुभाजकास कार्बींग व चेनलिंक फॅसींग करणेच्या कामाकरिता आवश्यक तरतूद वर्ग करणेबाबत - मा.गणेश लोंढे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२६) मे.डिझाईन स्टुडीओच्या सौ.छाया चव्हाण तिखीर यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक करणेबाबत - मा.गणेश लोंढे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२७) सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत - मा.गणेश लोंढे,मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२८) तरतुद वर्ग करणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.२९) पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानपगरपालिका तसेच १४ नगरपालिका यांचे मैलापाण्यामूळे मूळा/मुठा व भिमा नदीचे पाणी अत्यंत प्रदुषित झाल्यामूळे पुणे जिल्हयातील २१० गावांच्या पिण्याच्या प्रश्नाबाबत.

विषय क्र.३०) ध्वनीक्षेपण व प्रकाश योजनेचे बील अदा करणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३१) सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३२) सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील ड प्रभाग व ड मुख्यालयातील कामांच्या तरतूदीमध्ये फेरबदल करणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३३) तरतूदी वर्गीकरण करणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३४) सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील स्थापत्य मुख्याकार्यालयाकडील कामांच्या तरतूदी मध्ये फेरबदल करणेबाबत-मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव

विषय क्र.३५) मनपाचे वृक्षारोपणासाठी मोठी रोपे पुरवठा करणेबाबत.

विषय क्र.३६) नागपंचमी सण साजरा करणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव

विषय क्र.३७) स्थायी समिती सभेची वेळ बदलणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३८) ठराव दुरुस्त करणेबाबत - मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव

विषय क्र.३९) पशुवैदयकीय विभागा करिता जनावरे पकडण्यासाठी स्वयंसेवी संस्थेची नेमणूक करणेबाबत

------------

खालील प्रमाणे सूचना मांडणेत आली-

सूचक - मा.सुनिता वाघेरे                    अनुमोदक - मा.सौ.सुषमा तनपुरे

मा.स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ३१/०७/२०१३ रोजी सकाळी ११.०० पर्यत तहकूब करणेत यावी.

सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.

-----------

मा.सभापती- मा.स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ३१/०७/२०१३ रोजी सकाळी ११.०० पर्यत तहकूब करणेत येत आहे.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिति

**कार्यपत्रिका क्रमांक - ७१**

**सभावृत्तांत**

दिनांक - ३१/०७/२०१३ वेळ - सकाळी ११.00 वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची दिनांक ३०/०७/२०१३ ची तहकूब सभा बुधवार दिनांक ३१/७/२०१३ रोजी सकाळी ११.00 वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा.जगताप नवनाथ दत्तु - सभापती
२) मा.अविनाश (दादा) टेकावडे
३) मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके
४) मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
५) मा.छाया जगन्नाथ साबळे
६) मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र
७) मा.भालेकर अरुणा दिलीप
८) मा.वाघेरे सुनिता राजेश
९) मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब
१०) मा.भोंडवे संगिता राजेंद्र
११) मा.शेंडगे आशा सुखदेव

याशिवाय मा.डॉ.श्रीकर परदेशी - आयुक्त, मा.तानाजी शिंदे - अति.आयुक्त, मा.झुरे – सह आयुक्त, मा.गायकवाड, मा.कुलकर्णी, मा.दुरगुडे - सहा. आयुक्त, मा.घाडगे – मुख्यलेखापरीक्षक, मा.गावडे - नगरसचिव, मा.कांबळे – प्र.शहर अभियंता, मा.सुरगुडे – विकास अभियंता, मा.चव्हाण,पाटील – सह शहर अभियंता, मा.डॉ.रॉय – प्र.आरोग्य वैद्य.अधिकारी, मा.दुधेकर, मा.निकम, मा.सवणे, मा.रामदास जाधव, मा.शरद जाधव, मा.तांबे मा.साळवी, मा.खाबडे, मा.सय्यद, मा.काची, मा.बरशेट्टी, मा.दांगट - कार्यकारी अभियंता, ,मा.साळुंके – मुख्य उद्यान अधीक्षक, मा.शिंपी - नगररचनाकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

ठराव क्रमांक – ३७८४ विषय क्रमांक – १
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – झोनिपु स्थापत्य
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके
संदर्भ:- मा.कार्यकारी अभियंता यांचे जा. क्र.झोनिपु/स्था/जा/कावि/६/२१/२०१३ दि.१२/०७/२०१३

मा.कार्यकारी अभियंता यांची शिफारस विचारात घेऊन -

निविदा नोटिस क्र. 1/46/2011-12, प्रभाग क्र. 71 मधील झोपडपट्टीक्षेत्रातील रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणे यास मान्यता मिळालेली आहे. सदर कामास मा.स्थायी समिती क्र. 2893 दि. 22/2/2013 अन्वये मान्यता मिळाली असून सदर ठरावामध्ये विषयांकीत कामास निविदा अटीप्रमाणे नगरसचिव यांचेकडे पत्र क्र. झोनिपु/स्था/नि/कावि/153/2013 दि.11/02/2013 अन्वये विषयपत्रामधील मजकूरातील डांबर, सिमेंट, लोखंड या तिन्ही मटेरीयलच्या निर्धारीत केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील हा भाग नजरचुकीने आलेला नाही. तरी याप्रमाणे सदर ठराव दुरूस्त करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७८५ विषय क्रमांक – २
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/७/कावि/१००/२०१३ दि.१६/०७/२०१३
विषय- भोसरी सर्व्हे नं. १३१ जुना कचरा डेपो येथे उद्यान विकसीत करणे.

विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७८६ विषय क्रमांक – ३
दिनांक – ३१/७/२०१३
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महिला व बाल कल्याण समिती ठराव क्रमांक ४ दिनांक १०/७/२०१३
विषय- महिलांसाठी ज्ञान कौशल्य वाढ कार्यक्रमाबाबत.

विषय क्रमांक ३ चा विचार दिनांक २०/८/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७८७ विषय क्रमांक – ४

दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – नगररचना

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/आ १/५७५/१३ दि.१८/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाचे नगररचना विभागाकडील मंजुर विकास योजनेव्यतिरिक्त मौजे वाकड येथील स.नं. २६० पै. मध्ये प्रस्तावित मूळा नदीवरील पूलाकरीता ३५.०० मी रूंदीचा रस्ता घोषित करणेबाबत जाहिर नोटीस मा. आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्ताव दि. ११/३/२०१३ अन्वये जनता संपर्क विभागाकडील जाहिरात क्र.३५५ नुसार दै लोकमत व दै टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रात दि. २८/३/२०१३ नुसार प्रसिध्द करणेत आली. जनतासंपर्क विभागाकडील नियम व अटीनुसार सदरची सूचना दै.टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्राने ८० चौ.से.मी. इतक्या कमी जागेत छपाई केली असल्याने दै.लोकमत या वृत्तपत्राला तेवढ्याच चौ.से.मी. आकारमानाचे बील देय आहेत. दै.टाईम्स ऑफ इंडिया र.रू.३७८४०/- व लोकमत मराठी २,८८०/- एकूण ४०,७२०/- सदरची रक्कम उपरोक्त वृत्तपत्रास अदा करणे आवश्यक असलेने दै टाईम्स ऑफ इंडिया व दै लोकमत यांना अदा करावयाच्या र.रू. ४०,७२०/- (अक्षरी र.रू. चाळीस हजार सातशे वीस फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७८८ विषय क्रमांक – ५

दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – नगररचना

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/आ १/५७६/१३ दि. १८/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाचे नगररचना विभागाकडील मौजे सांगवी-बोपोडी येथे मुळा नदीवर पुल बांधणेकामी मौजे सांगवी येथील स.नं.३ पैकी जागेत १८ मी रुंद रस्ता मुंबई प्रांतिक महापालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये प्रसिध्द करणेबाबत जाहिर नोटीस मा.आयुक्त यांचेकडील मान्य प्रस्ताव दि.२२/१२/२०१२ अन्वये जनता संपर्क विभागाकडील जाहिरात क्र.२५० नुसार दै.लोकसत्ता व दै.सकाळ या वृत्तपत्रात दि.८/१/२०१३ नुसार प्रसिध्द करणेत आली. जनता संपर्क विभागाकडील नियम व अटीनुसार सदरची सूचना दै.सकाळ या वृत्तपत्राने ५६ चौ.से.मी. इतक्या कमी जागेत छपाई केलेली असल्याने दै.लोकसत्ता या वृत्तपत्राला तेवढ्याच चौ.से.मी. आकारमानाचे बील देय आहेत. दै.सकाळ मराठी १२,६००/- व दै.लोकसत्ता मराठी १३,७२०/- एकूण २६,३२०/- प्रमाणे रक्कम उपरोक्त वृत्तपत्रास अदा करणे आवश्यक असलेने दै.लोकसत्ता व दै.सकाळ यांना अदा करावयाच्या र.रू..२६,३२०/- (अक्षरी र.रू.सव्वीस हजार तीनशे वीस फक्त) या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७८९ विषय क्रमांक –६
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – स्थानिक संस्था कर
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्थासंक/१०ब/कावि/२००/२०१३ दि.१९/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

स्थानिक संस्था कराची नोंदणी मनपाच्या आर्थिक हिताची असल्यामुळे व्यावसायिकांनी स्थानिक संस्था कराची नोंदणी करावी यासाठी त्यांना पत्र देणे आवश्यक आहे तसेच ज्या व्यावसायिकांनी नोंदणी केलेली आहे त्यांना नोंदणी प्रमाणपत्रे पाठविण्याकरीता येणा-या पोस्टाचा खर्च हा तातडीची गरज, कालमर्यादा लक्षात घेऊन निवीदा/कोटेशन न मागविता, करारनामा न करता केलेली असल्याने या कामासाठी वरिष्ठ पोस्ट मास्टर पुणे प्रधान डाकघर पुणे-०१ यांना अदा केलेल्या आगाऊ रक्कम खर्चास व होणा-या प्रत्यक्ष खर्च र.रू.२,८०,०००/- रक्कमेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९० विषय क्रमांक –७
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – वायसीएमएच
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.वायसीएमएच/१/कावि/१२०/२०१३
दि. १८/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

वाय.सी.एम.रुग्णालयाचे डायलिसिस विभागामधील, "Gambro" कंपनीचे दोन डायलिसिस मशिनकरिता चार नग फिल्टर खरेदीकामी उत्पादक कंपनीचे अधिकृत विक्रेते मे.मनाली एंटरप्रायझेस यांनी सादर केलेल्या दरानुसार, थेट पध्दतीने निविदा न मागविता खरेदी करणेकामी करारनामा करणेस व त्यासाठी येणा-या र.रु.४१,६००/- (अक्षरी र.रु.ऐकेचाळीस हजार सहाशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९१ विषय क्रमांक –८
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – क्रिडा
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.क्रिडा/३/कावि/२७१/२०१३ दि. १७/०७/२०१३

विषय - सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षात नोंदणीकृत सर्व संस्था/मंडळे यांना अनुंदान देणेबाबत.

विषय क्रमांक ८ चा विचार दिनांक ०३/०९/२०१३ चे सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९२ विषय क्रमांक – ९
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – दूरसंचार
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/४/कावि/१७३/२०१३ दि.१२/०७/२०१३

मा.महापालिका अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोबाइल धारकांना Bulk SMS द्वारे जनजागृतीपर SMS पाठविणेत येतात. भविष्यात वेगवेगळ्या कारणांसाठी जनजागृती करणेसाठी साधारणत: १ कोटी SMS पाठविणेबाबतचे काम निविदा मागवून करणे आवश्यक आहे. सदर कामासाठी अंदाजे १५ लाख तरतूद आवश्यक असून ती संगणक विभागाकडील “ई-गव्हर्नन्स/ई-ऑफीस” या लेखाशिर्षावरून दूरसंचार विभागाचे “मनपाचे विविध अधिकारी/पदाधिकारी SMS द्वारे विविध कार्यक्रमांची माहिती देणे.” या लेखाशिर्षावर र.रू.१५ लाख वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९३ विषय क्रमांक – १०
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – स्थापत्य
सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे
संदर्भ:- मा.शहर अभियंता यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२२७/२०१३ दि. २३/०७/२०१३

मा.शहर अभियंता यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र. २६/२/२०१२-१३ मधिल प्रभाग क्र. ९८ मधील आरक्षणाच्या जागा विकसित करणेकामी मे.निलेश उत्तमराव बोधले (नि.र.रु.२३,३४,२६७/- (अक्षरी र.रु. तेविस लाख चौतीस हजार दोनशे सदुसष्ट) पेक्षा १८.३६ % कमी) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.२०,००,९८०/- पर्यंत काम करून घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९४ विषय क्रमांक – ११
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – स्थापत्य मुख्यालय
सुचक – मा.सुषमा तनुपरे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/४ड/कावि/२२६/२०१३ दि. २३/०७/२०१३

विषय- वर्गीकरण करणेबाबत.

विषय क्रमांक ११ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९५ विषय क्रमांक – १२
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – लेखा
सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.लेखा/०५/कावि/२३५४/२०१३ दि. २२/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखा विभागातील सन २००८-०९ ते २०११-१२ या आर्थिक वर्षातील ताळेबंदपत्रक (Balance Sheet) तयार करणेकामी मा.आयुक्तसाहेब यांचेकडील दिनांक ०७/०६/२०१३ चे मान्य प्रस्तावानुसार फेरकोटेशन मागविण्यात आले आहे. त्यात १) मे.ए.एन. गावडे अॅन्ड कंपनी (चार्टर्ड अकांऊटंट) २) मे. सतिश नगरे अॅण्ड असोसिएट (चार्टर्ड अकांऊटंट) ३) मे. एम.पी.नवसारीकर अॅण्ड कंपनी (चार्टर्ड अकांऊटंट) यांचे कोटेशन प्राप्त झाले असून प्राप्त कोटेशननुसार सर्वात कमी दराचे कोटेशन मे. सतिश नगरे अॅण्ड असो. मुबंई ४०० ०६४ यांचे एकूण र.रु.१६,३०,०००/- चे दर प्राप्त झाले आहे. सदरचे दरास व येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९६ विषय क्रमांक – १३
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – स्था-BRTS
सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/ BRTS/५२८/२०१३ दि. २२/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मुंबई पुणे रस्ता दापोडी येथे हॅरीस ब्रिजला समांतर पूल बांधणे कामासाठी मे.कन्सलटींग इंजिनिअरींग सर्व्हिसेस (इं) प्रा.लि. [CES (I) Pvt.] यांना प्रकल्प सल्लागार नेमणे व मा.स्थायी समिती ठराव क्र.४७१५ दि.२०/१२/२००३ च्या पूर्वमान्यदराने खालील तक्त्याप्रमाणे करून घेण्यास मान्यता देणेत येत आहे.

| पूल व प्रकल्प | निविदापूर्व कार्य (निविदा स्विकृत रक्कम) | निविदेनंतरची कार्ये (निविदा स्विकृत रक्कम) |
|---|---|---|
| पूल व प्रकल्प | **१.सर्वेक्षण – रू.१,१०,०००/-**<br>**२.नियोजन – रू.४५,०००/-**<br>**३.वाहतूक सर्वेक्षण – रू.४५,०००/-**<br>**४.निविदा कार्य – रू.२,००,०००/-**<br>**५.मृदू सर्वेक्षण – स्विकृत दरसूची + १५%** | २% + ०.५% संकल्पचित्र तपासणीकरिता |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९७ विषय क्रमांक – १४
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – दूरसंचार
सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.सुनिता वाघेरे
संदर्भ:- मा.महापालिका अति.आयुक्त यांचे जा.क्र.दूरसंचार/२/कावि/२५४/२०१३ दि.२३/०७/२०१३

मा.महापालिका अति.आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

कार्यालयीन कामकाजासाठी खालील अधिकारी/कर्मचारी यांस मोबाईल सुविधा पुरविणे आवश्यक असल्याने अधिकारी/कर्मचारी यांस मोबाईल वापराची प्रतिमाह अधिकतम वापर मर्यादा त्याच्या पदासमोर नमुद केल्याप्रमाणे निश्चित करुन मोबाईल सीम सुविधा पुरविणेस व होणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

| **अ.क्र** | **पदनाम** | **संख्या** | **वापर मर्यादा र.रु.** |
|---|---|---|---|
| **१** | **डॉक्टर्स** | **२** | **३००/-** |
| **२** | **कनिष्ठ अभियंता** | **५** | **३००/-** |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९८ विषय क्रमांक – १५
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – जनता संपर्क व स्वागत
सुचक – मा.आशा शेंडगे अनुमोदक – मा.संगिता भोंडवे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जस/५/कावि/४१४/२०१३ दि. २२/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या जनतासंपर्क विभागामार्फत विविध कारणास्तव विविध मान्यवरांचे तसेच मनपा अस्थापनावरील सेवानिवृत्त होणा-या अधिकारी/कर्मचा-यांच्या सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात येत असते. याकामी सत्कार साहित्य मध्यवर्ती भांडार विभागाकडून जनतासंपर्क कार्यालयास उपलब्ध होते. तथापी मध्यवर्ती भांडार विभागाकडील शाल पुरवठयाबाबतची निविदा कार्यवाही पूर्ण न झाल्याने जनतासंपर्क विभागामार्फत मे.स्टार फॅब्रीक्स, निगडी यांचेकडून क्रिम कलरच्या मध्यम प्रतीच्या ४८x९० साईजच्या ५१ नग शाली र.रू. १९८.५० या दराने तातडीने खरेदी करण्यात आल्या होत्या. याकामी र.रु. १०,१२४/- (अक्षरी र.रु. दहा हजार एकशे चोवीस फक्त) इतका खर्च झालेला आहे. सदरचा खर्च थेट पध्दतीने करण्यात आला असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३७९९ विषय क्रमांक – १६
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – ड प्रभाग
सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.आशा शेंडगे
संदर्भ:- मा.प्रभाग अधिकारी यांचे जा.क्र.डप्र/१७/कावि/२३९/२०१३ दि.२३/०७/२०१३

मा.प्रभाग अधिकारी यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या ड प्रभाग कार्यालयाकडील नि.नो.क्र.७/२०१२-१३ मधील अ.क्र.१२ अन्वये, थेरगांव वॉर्ड क्र.८६ मध्ये मंडपाची व्यवस्था करणेकामी मे.साक्षी इंजिनिअर्स (नि.र.रू.८,४०,१४४/- (र.रू.आठ लाख चाळीस हजार एकशे चव्वेचाळीस) पेक्षा १७.८६ % कमी) या ठेकेदाराबरोबर करारनामा करून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०० विषय क्रमांक – १७
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र
सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.जशुके/पापु/आस्था२/कावि/६९६/२०१३
दि. १९/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

जलशुध्दीकरण से. २३ पाणीपुरवठा विभागातील "**इतर खर्च –"कार्यालयीन आकस्मिक खर्च**" या लेखाशिर्षावरुन र.रु.२३,०००/- एवढी रक्कम "बोनस तथा सानुग्रह अनुदान" या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०१ विषय क्रमांक – १८
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – पर्यावरण
सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पअक/१/कावि/२२४/२०१३ दि. २३/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या पर्यावरण अभियांत्रिकी विभागाकडील नि.नो.क्र.मुख्यालय/५/१८/ २०१२-१३ मधील अ.क्र.८ अन्वये, मोशी कचरा डेपो साठी उर्वरित सिमाभिंतीचे काम करणेकामी मे.व्ही.एम.मातेरे इन्फ्रास्ट्रक्चर (इं) प्रा.लि. (नि.र.रु.१,३९,९९,०६८/- (अक्षरी र.रु.एक कोटी एकोणचाळीस लाख नव्याण्णव हजार अडुसष्ट) पेक्षा +७.०० % जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने काम करुन घेणेस तसेच निविदा अटी प्रमाणे सिमेंट, लोखंड यांचे मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचे आदेश देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०२ विषय क्रमांक – १९
दिनांक – ३१/७/२०१३ विभाग – विदयुत मुख्यालय
सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे
संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.विमुका/४/कावि/४१३/२०१३ दि. २४/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.१४/२०१२-१३ मधील अ.क्र.४ अन्वये, अशुध्द जलउपसा केंद्र रावेत येथील पंपगृहातील टप्पा-१ व २ अंतर्गत पंपींग मशिनरीची वार्षिक पध्दतीने देखभाल दुरुस्ती करणेकामी मे.फ्लोमॅक इंजिनिअरिंग कार्पोरेशन (नि.र.रु.४६,९६,१८०/-

(अक्षरी र.रु. सेहेचाळीस लाख शहाण्णव हजार एकशे ऐंशी) पेक्षा ५.४९ % (सुधारित दर) कमी) या ठेकेदाराबरोबर वरील कामाचा करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०३ विषय क्रमांक – २०

दिनांक – ३१/७/२०१३ विभाग –स्थापत्य

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.स्था/नि/४ड/कावि/२२७/२०१३ दि. २५/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.१/२०१३-१४ मधील अ.क्र.१ अन्वये, वॉर्ड क्र.८१ काळेवाडी मधील आरक्षण क्र.६४० मध्ये प्राथमिक शाळा इमारत बांधणे (भाग-२) कामी मे.देव कन्स्ट्रक्शन (नि.र.रु.२,३१,९५,२०३/- (अक्षरी र.रु.दोन कोटी एकतीस लाख पंच्यान्नव हजार दोनशे तीन) पेक्षा २०.०९ % जास्त) या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रू. २,७८,५५,११९/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ३८०४ विषय क्रमांक – २१

दिनांक – ३१/०७/२०१३ विभाग – स्थापत्य अ प्रभाग

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.सुषमा तनपुरे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे स्था/अप्रभाग/१४८/२०१३ दि.२९/०७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

आकुर्डी जी ब्लॉक येथे मनपाचे सर्पोद्यान आहे. सदर सर्पोद्यानाचे जागेत प्राणी संग्रहालय करण्याचे नियोजन करण्यात येत आहे. सदर प्राणीसंग्रहालयासाठी केंद्र शासनाच्या सेंट्रल झू अथॉरिटी यांच्याकडून परवानगी मिळविणेसाठी वेळोवेळी पाठपुरावा करणे, तसेच वास्तुविशारदीय सेवा पुरविणे यासाठी अनुभवी आर्कीटेक्ट नेमणे आवश्यक आहे. मनपाच्या मान्यता असलेल्या पॅनलवरील आर्कीटेक्ट मे.पी.के.दास अन्ड असोशिएटस् हे सध्या मनपाच्या पर्यटन विकास आराखडयाचे कामी करीत आहे. त्यामुळे सदर कामासाठी देखील त्यांच्या अनुभवाचा विचार करता नेमणूक करणे योग्य होणार आहे. तरी मे.पी.के.दास अन्ड असोशिएटस् यांची बहिणाबाई चौधरी प्राणी संग्रहालाचे अतिरिक्त वास्तूविशारदीय सेवा पुरविणेकामी नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर विषय सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०५ विषय क्रमांक – २२
दिनांक – ३१/०७/२०१३ विभाग – स्थापत्य EWS प्रकल्प
सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे स्था/EWS प्र/२९०/२०१३ दि.२९/०७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीनुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे JnNURM-BSUP अंतर्गत से.क्र. १७ व १९ चिखली येथील २५.३० हेक्टर जमीनीत आर्थिक दुर्बल घटकांसाठी गृह योजना (EWS Housing Project) चालू आहे. सदरची जागा २००७ मध्ये प्राधिकरणाने म.न.पा.स क्रिडांगणासाठी हस्तांतरीत केली होती. त्यावेळेस सदर जागेचे प्रयोजन हरीत विभाग (Green Zone) असे होते. त्यावेळेस प्राधिकरण व महानगरपालिकेमध्ये रितसर करारनामा होऊन सदर भूखंडापोटी र.रु.१/- प्रति चौ.मी. प्रमाणे रु.२,५३,०२०/- इतकी रक्कम मनपाने प्राधिकरणास अदा केली होती. जागेचे Agreement दि.२७/०२/२००९ रोजी केले. JnNURM-BSUP अंतर्गत EWS Housing प्रकल्पाकरिता घरे बांधण्यासाठी निविदा काढणेकामी सदर भूखंडाचा अंतर्भाव
केला. सदर भूखंडाचे प्रयोजन EWS Housing करण्यासाठी प्राधिकरणाने M.R. & T.P. Act-1966 च्या 37 अन्वये कार्यवाही केली. भूखंडाचे प्रयोजन बदलून ते रहिवास क्षेत्र झाल्याने प्राधिकरणाने पत्र क्र. विप्रा/माविवि/विभाग-३/६२७७ दि.१५ ऑक्टोबर २००८ अन्वये र.रु.११३.८९ कोटींची मागणी केली त्यावर महानगरपालिकेने प्राधिकरणास महाराष्ट्र शासनाच्या गृहनिर्माण विभागाच्या २५ जुन २००७ च्या निर्णयास अनुसरुन सदर भुखंडाचे अधिमुल्य माफ करणेबाबत/सवलतीच्या दरात अधिमुल्य आकारणेबाबत विनंती केली. याबाबत प्राधिकरणाने शासनाकडे मार्गदर्शन मागितले. महाराष्ट्र शासन जो निर्णय देईल तो म.न.पा.स मान्य असेल असे मनपामार्फत कळविण्यात आले. नगरविकास विभागाचे कक्ष अधिकारी यांनी त्यांचे पत्र क्र.PCC-3012/प्रक्र४५६/नवि-२२ दि.४/७/२०१३ अन्वये “अधिमुल्य निश्चितीबाबत प्राधिकरणाचा भूवाटप नियमावलीच्या विनियम १२ अन्वये प्राधिकरणास असलेल्या अधिकारात अधिमुल्य निश्चित करावे,” असे निर्देश दिले. यानुसार प्राधिकरण सभा दि. १७/७/२०१३ च्या प्राधिकरण सभा क्र. ३०५ मध्ये विषयांकित जागेचे अधिमुल्य निश्चित करणेबाबत चर्चा होऊन खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

१) सदर जागेचे अधिमुल्य र.रु.२४,५८,९६,९१७ + सर्व्हिस टॅक्स (भूसंपादन खर्च + त्यावरील व्याज + विकास कामाचा खर्च मिळून) आकारण्यात यावे.
२) ही रक्कम महानगरपालिकेने २ महिन्यांत प्राधिकरणास अदा करावी.
३) याबाबत पुढे शासनाने, न्यायालयात चालू असलेल्या दाव्यामध्ये अगर वेगवेगळ्या लेखापरिक्षणात या जमीनीच्या अधिमुल्य आकारणीबाबत भविष्यात काहीही वेगळे निर्देश दिले गेले व त्यामुळे अधिमुल्याच्या रकमेत काही बदल झालातर अधिमुल्यातील होणा-या फरकाची रक्कम महानगरपालिका विनाअट व तात्काळ प्राधिकरणास देईल. याबाबत महानगरपालिकेने लेखी हमीपत्र प्राधिकरणास सादर करावे.

या ठरावाच्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी प्राधिकरण यांनी त्यांचे पत्र क्र. विप्रा/भुविभाग-१/११०३ दि.१९/०७/२०१३ अन्वये, “सुधारीत अधिमुल्य रक्कम रु.२४,५८,९६,९१७/- + सर्व्हिस टॅक्स् या पत्राचे दिनांकापासून २ महिन्यांत प्राधिकरणास अदा करणेत यावी व ठरावात नमूद केल्याप्रमाणे लेखी हमीपत्र प्राधिकरणास सादर करण्यात यावे” अशी विनंती केली आहे. सदर भूखंड प्राधिकरण क्षेत्रात असल्याने विषयांकित प्रकल्पास त्यांचेकडून बांधकाम परवानगी प्राप्त आहे. सदर प्रकल्पाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे. –

| | | |
|---|---|---|
| प्राप्त बांधकाम परवानगी | - | ६७२० |
| आर.सी.सी. बांधकाम पुर्ण | - | ५३८८ |
| वाटपासाठी तयार गाळे | - | २०१६ |

दि.०९/०७/२०१२ च्या पत्रान्वये प्राधिकरणास भाग पुर्णत्वाच्या दाखल्याची मागणी केलेली आहे. तथापि, भूखंडाचे अधिमुल्य प्राप्त झाल्यानंतरच मनपास भाग पुर्णत्वाचा दाखला मिळू शकणार आहे. सदनिका तयार आहेत. ब-याच लाभार्थ्यांनी त्यांचा हिस्सा भरलेला आहे. या पार्श्वभुमीवर लाभार्थ्यांकडून, सदनिका वाटप तातडीने होणेबाबत वारंवार मागणी होत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता प्राधिकरणाने मागणी केलेप्रमाणे विषयांकित जमिनीचे सुधारीत अधिमुल्य र.रु.२४,५८,९६,९१७/- + सर्व्हिस टॅक्स् तातडीने अदा करणेत यावे असे वाटते. तसेच प्राधिकरणाने कळविल्याप्रमाणे जमिनीच्या अधिमुल्य आकारणीबाबत भविष्यात काहीही वेगळे निर्देश दिले गेले व त्यामुळे अधिमुल्याच्या रकमेत काही बदल झाला तर अधिमुल्यातील होणा-या फरकाची रक्कम महानगरपालिका विनाअट व तात्काळ प्राधिकरणास देईल. अशा आशयाचे लेखी हमीपत्र प्राधिकरणास सादर करणेकामी जुलै २०१३ च्या मा.महापालिका सभेमध्ये दि.२६/०७/२०१३ रोजी मान्यता मिळालेली आहे. तरी मा.महापालिका सभेने दिलेल्या मान्यतेनुसार “र.रु.२४,५८,९६,९१७/- + सर्व्हिस टॅक्स् पिंपरी चिंचवड नवनगर विकास प्राधिकरण (PCNTDA) यांना देणेकामी तसेच जमीनीच्या अधिमुल्य आकारणेबाबत भविष्यात काहीही वेगळे निर्देश दिले गेले व त्यामुळे अधिमुल्याच्या रकमेत काही बदल झाली तर अधिमुल्यातील होणा-या फरकाची रक्कम महानगरपालिका विना अट तात्काळ प्राधिकरणास देईल आशा आशयाचे लेखी हमीपत्र प्राधिकरणास सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.”

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०६ विषय क्रमांक – २३

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.विनया तापकीर अनुमोदक – मा.छाया साबळे

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव –

अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील सन २०१३-१४ च्या अंदाजपत्रकातील अ प्रभाग स्थापत्य विभागाकडील काही कामांना कमी तरतूद असल्यामुळे या कामांची देयके अदा करता येत नाही. तरी सन २०१३-१४ च्या मुळ अंदाजपत्रकातील एका कमी तरतूद असलेल्या कामांस र.रु.६०,००,०००/- एवढी रक्कम याच प्रभागातील जास्त तरतूद असलेल्या तसेच नविन

कामामध्ये होणा-या बचतीमधून एकूण २ इतर कामामधून प्रस्तावात नमूद प्रमाणे तरतूद वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०७ विषय क्रमांक – २४

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.अरुणा भालेकर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव –

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील " ड " प्रभाग व " ड " मुख्यालयातील कामांच्या तरतूदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

( वाढ - घट र.रु.३८,८५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक – ३८०८ विषय क्रमांक – २५

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव –

निगडी प्राधिकरण ४५ मी. रुंदीच्या स्पाईन रस्त्यावरील मध्य दुभाजकास कार्बीग व चेनलिंक फेंसीग करणेचे काम मे.देशमुख अन्ड कंपनी यांनी निविदा क्र.५५/२-२०११/१२ नुसार काम चालू करुन ९० टक्के काम पूर्ण केले आहे. या कामाची निविदा र.रु.७७,९३,६१२/- इतकी असून सन २०१३-१४ करिता स्थापत्य – उद्याने या लेखाशिर्षावर पान क्र.४६२, अ.क्र.७९ अन्वये या कामाकरिता र.रु.२५,००,०००/- इतकी तरतूद करण्यात आली होती. सद्यस्थितीत संपुर्ण तरतूद खर्ची पडलेली असून काम पुर्ण करण्याकरिता र.रु.१५,००,०००/- इतकी आवश्यकता आहे. वरील कामाकरिता आवश्यक तरतूद पान क्र.४६३ वरील अ.क्र.९१ वरील कामातून र.रु.७,५०,०००/- व ९२ वरील कामातून र.रु.७,५०,०००/- असे एकूण र.रु.१५,००,०००/- ची वजावट करुन पान क्र.४६२, अ.क्र.७९ वरील उपरोक्त

" निगडी प्राधिकरण ४५ मी. रुंदीच्या स्पाईन रस्त्यावरील मध्य दुभाजकास कार्बीग व चेनलिंक फेंसीग करणे " या कामावर वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८०९ विषय क्रमांक – २६

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.शकुंतला धराडे

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.अरुणा भालेकर यांचा प्रस्ताव –

मनपामध्ये अनेक प्रकारचे लोकोपयोगी प्रकल्प उभारण्यात येत आहेत. सदर कामाच्या नियोजनाकरिता अनेक प्रकारचे तज्ञ आर्किटेक्टची आवश्यकता असते. मे.डिझाईन स्टुडिओच्या आर्किटेक्ट सौ.छाया चव्हाण – तिरवीर यांनी केलेल्या उल्लेखनीय कामांचा विचार करता व मनपाच्या विकासामध्ये अशा तज्ञ आर्किटेक्टचे योगदान घेण्याच्या दृष्टीने त्यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनेलवर नेमणूक व्हावी असे वाटते. तरी मे.डिझाईन स्टुडिओच्या आर्किटेक्ट सौ.छाया चव्हाण – तिरवीर यांची मनपाच्या आर्किटेक्ट पॅनलवर सन २०१३-१७ या कालावधीकरीता नेमणूक करणेस व पॅनेलच्या अटी व शर्तीनुसार करारनामा करुन फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१० विषय क्रमांक – २७

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा. छाया साबळे

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील “ ड ” प्रभाग व “ ड ” मुख्यालयातील कामांच्या तरतूदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

( वाढ - घट र.रु.७२,३२,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८११ विषय क्रमांक – २८

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.अविनाश टेकावडे

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ या आर्थिक वर्षामध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्ग करण्यास मान्यता देणेत येत आहे.

( वाढ - घट र.रु.८८,५०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१२ विषय क्रमांक – २९

दिनांक – ३१/०७/२०१३ विभाग – जलनि:सारण

सुचक – मा.अविनाश टेकावडे अनुमोदक – मा.चंद्रकांत वाळके

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र.जनि/१०/कावि/५०/२०१३ दि.२९/०७/२०१३.

मा.महापालिका आयुक्त यांनी केलेल्या शिफारशीनुसार -

पिंपरी चिंचवड महानगरपालिका व पुणे महानगरपालिका तसेच १४ नगरपालिका यांचे मैलापाण्यामुळे मुळा मुठा व भिमा नदीचे पाणी अत्यंत प्रदुषित झाल्यामुळे पुणे जिल्ह्यातील २१० गावांच्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नाबाबत मा.विधानसभा अध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली तसेच मा.मंत्री, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांच्या उपस्थितीत दि.३/४/२०१२ व दि.१६/०१/२०१३ व त्यानंतर दि.०९/०७/२०१३ रोजी बैठक झाली असून भिमा व तिच्या उपनद्यांकाठी असलेल्या १२६ गावांना शुद्ध् पाणी पुरवठा होण्यासाठी, तातडीची उपाय योजना करण्यासाठी जलशुध्दीकरण यंत्रणा (आर.ओ.) बसविणे आवश्यक असून त्याचा खर्च पुणे महानगरपालिका व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी समसमान सोसावा असे निर्देश मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दिलेले आहेत.

वरील प्रस्तावाची छाननी करुन मावळ तालुक्यातील शहराच्या उर्ध्व बाजूस असलेली ५० गावे वगळता ७६ गावांसाठी आर.ओ.यंत्रणा बसविणेसाठी र.रु.१०१३ लक्ष इतका खर्च अपेक्षित असून त्यात पिंपरी चिंचवड महानगरपालिका ५० टक्के म्हणजे र.रु.५०६.५० लक्ष इतकी रक्कम पुणे जिल्हा परिषदेस द्यावी लागणार आहे. सदर विषयास मा.महापालिका सभेने दि.२६/०७/२०१३ रोजी मान्यता दिली आहे. सदर बाबीसाठी अंदाजपत्रकात तरतूद नाही तथापि भुयारी गटर योजना अंतर्गत अंदाजपत्रक पान क्र. ७५० अ.क्र.४ नुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण व महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ या शासनाच्या संस्थांना भूमिगत मलवाहिनी टाकण्याचे परवानगीकामी रक्कम अदा करणे या उपलेखाशिर्षाखाली उपरोक्त रक्कम अदा करावी असे वाटते त्याप्रमाणे अदा करावयाचे झाल्यास खालीलप्रमाणे तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | अंदाजपत्रक सन २०१३-१४ पान क्र. व अ.क्र. | उपलब्ध तरतूद (रक्कम रुपये लक्ष) | लागणारी तरतूद | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | भु.ग.यो. (अ प्रभाग) | ७४७/२९ | १५० | १०३.५० | - | ४६.५० |
| २ | भु.ग.यो. (अ प्रभाग) | ७४८/४३ | १०० | ४० | - | ६० |
| ३ | भु.ग.यो. (अ प्रभाग) | ७४८/४४ | २५ | ०० | - | २५ |
| ४ | भु.ग.यो. (ब प्रभाग) | ७५०/४ | ५ | ५११.५० | ५०६.५० | - |
| ५ | भु.ग.यो. (क प्रभाग) | ७५७/६ | १२५ | ०० | - | १२५ |
| ६ | भु.ग.यो. (ड प्रभाग) | ७६३/२४ | २०० | ०० | - | २०० |
| ७ | भु.ग.यो. (ड प्रभाग) | ७६२/२५ | ५० | ०० | - | ५० |
| | | | ६५५ | ६५५ | ५०६.५० | ५०६.५० |

वरील प्रमाणे वर्गीकरण करुन पुणे जिल्हा परिषदेस र.रु.५०६.५० लक्ष अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१३ विषय क्रमांक – ३०

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.संगिता भोंडवे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड मनपा सार्वत्रिक निवडणूक २०१२ करीता क प्रभाग अंतर्गत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय / मतदारन प्रशिक्षण केंद्र / व मतमोजणी केंद्रावर तात्पुरत्या स्वरुपात ध्वनीक्षेपण व प्रकाश व्यवस्था केलेल्या कामाचे मे.एन.के. इलेक्ट्रीकल्स वर्क्स यांना पूर्व स्विकृत दराने करारनामा न करता बिल र.रु.४,५७,२५९/- पेक्षा ६ टक्के कमी दराने र.रु.४,२९,८२३/- अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१४ विषय क्रमांक – ३१

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील “ ड ” प्रभाग व “ ड ” मुख्यालयातील कामांच्या तरतूदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

( वाढ - घट र.रु.६,९०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१५ विषय क्रमांक – ३२

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.अरुणा भालेकर अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील “ ड ” प्रभाग व “ ड ” मुख्यालयातील कामांच्या तरतूदींमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे.

( वाढ - घट र.रु.१,०२,७०,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१६ विषय क्रमांक – ३३

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.शकुंतला धराडे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

महानगरपालिकेच्या सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकामध्ये वॉर्ड क्र.२४ इंद्रायणीनगर येथील कामासाठी प्रस्तावात नमुद प्रमाणे तरतूद वर्गीकरण करणेस तसेच सदरचा ठराव कायम होणेची वाट न पाहता ठरावा प्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

( वाढ - घट र.रु.२,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१७ विषय क्रमांक – ३४

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

सन २०१३-१४ च्या अर्थसंकल्पातील स्थापत्य मुख्यकार्यालयाकडील विशेष योजना या लेखाशिर्षाखालील कामांच्या तरतूदीमध्ये प्रस्तावात नमुद प्रमाणे फेरबदल करण्यास मान्यता देणेत येत आहे. ( वाढ - घट र.रु.२४,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१८ विषय क्रमांक – ३५

दिनांक – ३१/०७/२०१३ विभाग - उद्यान

सुचक – मा.चंद्रकांत वाळके अनुमोदक – मा. संगिता भोंडवे

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे क्र. उद्यान/४/कावि/२८५/२०१३, दिनांक ३०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

मनपाचे वृक्षारोपणासाठी मोठी रोपे पुरवठा करणेबाबत निविदा नोटीस क्र.१७/२०१२-१३ नुसार मोठी वृक्षारोपणाची रोपे पुरवठा करणेबाबत निविदा नोटीस प्रसिध्द करणेत आली होती. त्यानुसार निसर्ग लॅन्डस्केप सर्व्हिसेस यांची निविदा सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९९% ने कमी या दराची होती. त्यानुसार मे.निसर्ग लॅन्डस्केप सर्व्हिसेस यांना ४००० रोपे पुरवठा करणेबाबत आदेश देणेत आला होता. त्यानुसार त्यांनी वेळेत ४००० वृक्षारोपणाची मोठी रोपे पुरविली असून त्याची लागवडही झालेली आहे. परंतु मनपा मार्फत जास्तीतजास्त मोठी रोपे लागवड करणेचे नियोजनानुसार ४००० मोठी रोपे अपुरी पडलेली आहेत. सदर वृक्षारोपणासाठी वाढीव २००० रोपांची आवश्यकता आहे. सदरची रोपे पुरविणेस मे.निसर्ग लॅन्डस्केप सर्व्हिसेस हे तयार आहेत. तरी मे.निसर्ग लॅन्डस्केप सर्व्हिसेस यांचेकडून वाढीव

२००० रोपे निविदा नोटीस क्र.१७/२०१२-१३ चे मंजूर दरानुसार म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.९९% ने कमी म्हणजेच रु.१०५६/- प्रती नग या दराने खरेदी करणेस व येणारा र.रु.२१,१२,०००/- चे खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८१९ विषय क्रमांक – ३६

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुषमा तनपुरे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

नवरत्न चौक काळेवाडी या ठिकाणी मनपातर्फे नागपंचमी आयोजित करण्यास व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२० विषय क्रमांक – ३७

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.छाया साबळे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

मनपाच्या स्थायी समितीची सभा प्रत्येक सप्ताहात मंगळवारी दुपारी ३.०० च्या ऐवजी सकाळी ११.०० वाजता भरविणेत यावी. तथापि मंगळवारी कार्यालयास सुट्टी / सुट्टया असलेस त्या सुट्टी / सुट्टया नंतर येणारे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११.०० वाजता सभा भरविणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२१ विषय क्रमांक – ३८

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.गणेश लोंढे, मा.विनया तापकीर यांचा प्रस्ताव –

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३६७७ दिनांक ०९/०७/२०१३ मध्ये " १५ x १५ ची जागा " हा मजकूर वगळण्यास व त्या ऐवजी " १५ x १५ च्या दोन खोल्या " हा मजकूर समाविष्ट करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ३८२२ विषय क्रमांक – ३९

दिनांक – ३१/०७/२०१३

सुचक – मा.सुनिता वाघेरे अनुमोदक – मा.विनया तापकीर

संदर्भ:- मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.पवै/०१/कावि/४१/२०१३, दि.३०/०७/२०१३

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पशुवैद्यकीय विभागामार्फत मनपा हद्दीतील मोकाट जनावरे / डुकरे पकडणे या कामकाजाकरिता नव्याने स्वयंसेवी संस्थेची नेमणूक करण्याची आवश्यकता आहे. तरी मे.महर्षि वाल्मिकी स्वयंरोजगार संस्था, पुणे यांची नेमणूक करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

(जगताप नवनाथ दत्तु)
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/४/कावि/७२१/२०१३
दिनांक - ०२/०८/२०१३.

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.